# शेतकरी जनता अपघात विमा योजना २०१३-१४

**महाराष्ट्र शासन**

कृषि,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,

शासन निर्णय क्रमांक - शेअवि-२०१३/प्र.क्र.११८/११-अे

मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२

**दिनांक - ३१ ऑक्टोबर, २०१३**

**वाचा:-** १) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्र. एनएआयएस १२०४/प्र.क्र.१६६/११-अे, दि. १९ ऑगस्ट, २००४

२) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्र. एनएआयएस १२०४/प्र.क्र.१६६/११-अे, दि. ५ जानेवारी, २००५

३) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्र. एनएआयएस १२०४/प्र.क्र.१६६/११-अे, दि. ३१ मार्च, २००५

४) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्र. शेअवि-२००७/प्र.क्र.२३२/११-अे, दि. १३ जुलै, २००७

५) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्र. शेअवि-२००९/प्र.क्र.२६८/११-अे, दि.४ डिसेंबर, २००९

६) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्र. शेअवि-२०१०/प्र.क्र.१७२/११-अे, दि. १० ऑगस्ट, २०१०

७) शासन शुद्धीपत्र, कृषि व पदुम विभाग क्र. शेअवि-२००९/प्र.क्र.२६८/११-अे, दि.५ मार्च, २०११

८) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्र. शेअवि-२०१३/प्र.क्र.१५६/११-अे, दि. २५ जुलै, २०१३

९) शासन पत्र कृषि व पदुम विभाग क्र.शेअवि-२०१३/प्र.क्र.११८/११-अे, दि.११ ऑक्टोबर, २०१३

**प्रस्तावना :-**

शेती व्यवसाय करताना होणारे अपघात, वीज पडणे, पूर, सर्पदंश, विंचूदंश, विजेचा शॉक बसणे इ. नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे अपघात, रस्त्यावरील अपघात, वाहन अपघात तसेच अन्य कोणत्याही कारणांमुळे होणारे अपघात यामुळे बऱ्याच शेतकऱ्यांचा मृत्यू ओढावतो किंवा काहींना अपंगत्व येते. घरातील कर्त्या व्यक्तिस झालेल्या अपघातामुळे कुटुंबाचे उत्पन्नाचे साधन बंद होवून अडचणीची परिस्थिती निर्माण होते. अशा अपघातग्रस्त शेतकऱ्यांस/त्यांच्या कुटुंबास आर्थिक लाभ देण्याकरिता कोणतीही स्वतंत्र विमा योजना नसल्यामुळे शासनाने संदर्भ क्र. १ व २ येथील शासन निर्णयान्वये शेतकरी व्यक्तिगत अपघात विमा योजना कार्यान्वित केलेली आहे. सन २००९-१० पासून सदर योजनेचे नाव बदलून त्याऐवजी **शेतकरी जनता अपघात विमा योजना** असे नामाभिधान करण्यात आले आहे.

सदर योजनेचे कल्याणकारी स्वरुप विचारात घेऊन ही योजना सन २०१३-१४ मध्येही चालू ठेवण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्यात **शेतकरी जनता अपघात विमा योजना** सन २०१३-१४ मध्ये दि. १ नोव्हेंबर,२०१३ ते दि. ३१ऑक्टोबर, २०१४ या कालावधीकरिता चालू ठेवण्यास या शासन निर्णयान्वये शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. या योजनेचा फायदा राज्यातील नोंदणीकृत अपघातग्रस्त शेतकऱ्यांना देण्यात येतो. उपरोक्त क्रमांक ६ येथील दि.१०ऑगस्ट, २०१० शासन निर्णयान्वये सन २०१०-११ ते सन २०१२-१३ या तीन वर्षांच्या कालावधीसाठी १,३७,००,००० इतकी शेतकरी संख्या निश्चित करण्यात आली आहे. सदर शेतकरी संख्या २०१३-१४ या वर्षासाठीही ग्राह्य धरण्यात येत आहे. त्यानुसार, प्रस्तावनेत नमूद कारणांमुळे होणारे अपघाती मृत्यू किंवा अपंगत्व यासाठी राज्यातील महसूल विभागाकडील ७/१२ वरील नोंदीप्रमाणे १० ते ७५ वर्षे वयोगटातील खातेदार शेतकऱ्यांच्यावतीने, योजनेच्या मंजूर कालावधीकरिता, प्रस्तुत शासन निर्णयाव्दारे विमा पॉलिसी उतरविण्यात येत आहे.

३. योजना कालावधीत संपूर्ण दिवसासाठी म्हणजेच विहित कालावधीतील प्रत्येक दिवसाच्या २४ तासांसाठी ही योजना लागू राहील. या कालावधीत शेतकऱ्याला केंव्हाही अपघात झाला किंवा अपंगत्व आले तरीही तो या योजनेंतर्गत लाभासाठी पात्र राहील.

४. या योजनेंतर्गत शेतकऱ्यांनी किंवा त्यांच्यावतीने अन्य कोणत्याही संस्थेने विमा कंपन्यांकडे स्वतंत्ररित्या विमा हप्त्याची रक्कम भरण्याची गरज नाही तसेच यापूर्वी शेतकऱ्यांनी अथवा त्यांच्यावतीने अन्य कोणत्याही संस्थेने कोणतीही वेगळी विमा योजना लागू केली असल्यास अथवा विमा उतरविला असल्यास त्याचा या योजनेशी काहीही संबंध असणार नाही. या योजनेंतर्गत मिळणारे लाभ स्वतंत्र असतील.

५.	उपरोक्त दि. १३ जुलै,२००७ च्या शासन निर्णयान्वये प्रधान सचिव (कृषि) यांच्या अध्यक्षतेखाली विमा हप्ता दर निश्चित करणे व विमा कंपन्यांची नियुक्ती करण्यासाठी समिती गठीत करण्यात आलेली आहे. सन २०१३-२०१४ मध्ये योजनेची अंमलबजावणी करण्याकरिता विमा कंपन्यांची नियुक्ती करण्याकरिता व विमा हप्ता दर ठरविण्याकरिता अप्पर मुख्य सचिव (कृषि) यांच्या अध्यक्षतेखाली दि.१७ ऑक्टोबर, २०१३ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीच्या वेळी सन २०१३-१४ या वर्षाकरिता प्रति शेतकरी रुपये १४.८६ इतका विमा हप्ता दर विमा कंपन्यांनी मान्य केला आहे.

६.	सन २०१३-१४ मध्ये दि. १ नोव्हेंबर,२०१३ ते दि. ३१ऑक्टोबर, २०१४ या कालावधीकरिता राज्यातील सर्व नोंदणीकृत शेतकऱ्यांना अपघातांपासून संरक्षण देण्यासाठी विमा सल्लागार कंपन्या, विमा कंपन्या, त्यांचेकडे सोपविण्यात आलेले विभाग, विमा संरक्षित शेतकरी संख्या व पहिल्या दहा महिन्याकरिता विमा कंपन्यांना अदा करावयाची विमा हप्ता रक्कम इ. खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे. विमा सल्लागार कंपन्या व विमा कंपन्या यांची दि. १ नोव्हेंबर,२०१३ ते दि. ३१ऑक्टोबर, २०१४ या कालावधीकरिता नियुक्ती करण्यात येत असून विमा सल्लागार कंपन्यांना शासनाच्यावतीने कोणतेही शुल्क अदा करण्यात येणार नाही. खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे दि.१.११.२०१३ ते दि.३१.८.२०१४ या दहा महिन्यांच्या कालावधीकरिता होणारी एकूण विमा हप्ता रक्कम रु. १६,९६,५१,६६६/- (रू. सोळा कोटी शहाण्णव लाख एकावन्न हजार सहाशे सहासष्ट फक्त) याद्वारे मंजूर करुन वितरित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| विमा सल्लागार कंपनी | विमा कंपनीचे नाव | सोपविण्यात आलेला विभाग | शेतकरी संख्या (लाख) | विमा हप्ता रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|---|
| युनिव्हर्सल इन्शुरन्स ब्रोकर्स सर्व्हिसेस प्रा.लि., २२६, कॅनडा बिल्डींग, तिसरा मजला, डॉ.डी. एन.रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१ | टाटा एआयजी जनरल इन्शुरन्स कंपनी लि. अे ५०१, पाचवा मजला, इमारत क्रमांक ४, इन्फीनिटी पार्क, दिडोंशी, मालाड (पुर्व) ,मुंबई ९७ | औरंगाबाद | ३३.२५ | ४११७४५८३ |
| अलमंडस इन्शुरन्स ब्रोकर्स प्रा.लि.मुंबई, लेव्हल ५, ग्रँडे पॅलाडियम, १७५,सीएसटी रोड, कलिना,सांताक्रूज(पू), मुंबई ९८ | टाटा अेआयजी जनरल इन्शुरन्स कंपनी लि. अे ५०१, पाचवा मजला, इमारत क्रमांक ४, इन्फीनिटी पार्क, दिडोंशी, मालाड (पुर्व), मुंबई ९७ | पुणे | ३५.९५ | ४४५१८०८३ |
| जायका इन्शुरन्स ब्रोकर्स प्रा.लि.नागपूर, दुसरा मजला, जायका बिल्डींग, कमर्शियल रोड, सिव्हिल लाईन्स, नागपूर ४४० ००१ | टाटा अेआयजी जनरल इन्शुरन्स कंपनी लि. अे ५०१, पाचवा मजला, इमारत क्रमांक ४, इन्फीनिटी पार्क, दिडोंशी, मालाड (पुर्व) ,मुंबई ९७ | नागपूर | १३.२५ | १६४०७९१७ |
| कबाल इन्शुरन्स ब्रोकींग सर्व्हिसेस प्रा. लि., मित्तल टॉवर्स, ११८-बी विंग, ११ वा मजला, नरिमन पॉईंट, मुंबई-४०० ०२१ | फ्युचर जनरली ईंडिया इन्शुरन्स कंपनी लि. पहिला मजला, हेरिटेज हाऊस, रमाबाई आंबेडकर मार्ग, सोहराब हॉल जवळ, पुणे ४११ ००१ | कोकण | १३.०० | १६०९८३३३ |
| डेक्कन इन्शुरन्स व रिइन्शुरन्स ब्रोकर्स प्रा.लि., २०१, मॉंट वर्ट झेनिथ, बाणेर रोड, पुणे ४५ | फ्युचर जनरली इंडिया इन्शुरन्स कंपनी लि. पहिला मजला, हेरिटेज हाऊस, रमाबाई आंबेडकर मार्ग, सोहराब हॉल जवळ, पुणे १ | अमरावती | १५.६० | १९३१८००० |
| लाईफ अँण्ड जनरल इन्शुरन्स ब्रोकर्स प्रा. लि., ३९२/अे, महाले प्लॉट, गोखलेनगर रोड, पुणे-४११ ०१६ | टाटा अेआयजी जनरल इन्शुरन्स कंपनी लि. अे ५०१, पाचवा मजला, इमारत क्रमांक ४, इन्फीनिटी पार्क, दिडोंशी, मालाड (पुर्व) ,मुंबई ९७ | नाशिक | २५.९५ | ३२१३४७५० |
| **एकूण** | | | १३७.०० | १६९६५१६६६ |